# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १५/१०/२०१७

## *पोलीस नक्षल चकमकीत हत्यारासह नक्षल साहित्य जप्त*

- *विशेष अभियान पथकाची कामगिरी*

गोपनिय माहितीच्या आधारे विशेष अभियान पथक गडचिरोली हे उपविभाग कुरखेडा अंतर्गत येणाऱ्या पोस्टे पुराडा हद्दितील चरवीदंड जंगल परिसरात नक्षलविरोधी अभियान राबवित असताना दिनांक १३/११/२०१७ रोजी सायंकाळी पोलीस नक्षल चकमक झाली. प्रत्युत्तरादाखल पोलीसांनी नक्षल्यांच्या दिशेने गोळीबार केला. चकमकीदरम्यान पोलीसांचा दबाव वाढल्याने नक्षल्यांनी जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

चकमकीनंतर जवानांनी घटनास्थळाचा शोध घेतला असता घटनास्थळावरुन एक ३०३ रायफल व ०७ नग जिवंत काडतूस जप्त करण्यास पोलीसांना यश आले आहे.

नक्षल्यांविरुध्द पोस्टे पुराडा येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच परिसरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.